# कोल्हापूर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

**जाहिर प्रसिध्दीकरण** **जाहिरात क्र.२ दि.१८/०६/२०२६**

कोल्हापूर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील काळम्मावाडी योजना व इतर प्रकल्पासाठी तसेच अमृत १.० व २.० पाणी पुरवठा योजना व ड्रेनेज कामासाठी तसेच पाणी पुरवठा विभागांतर्गत यांत्रिकी व वितरण शाखेकडील विवक्षित कामासाठी तसेच नगररचना विभागाकडे विवक्षित कामासाठी शासकीय / निमशासकीय सेवेतील वर्ग-१ व वर्ग-२ सवंर्गातील खालील नमूद केलेल्या पदाचा किमान ३ वर्षे अनुभव असलेले सेवा निवृत्त अधिकारी यांचेकडून सेवा करार पध्दतीने ६ महिने कालावधी करीता भरणेकामी मुलाखतीसाठी अर्ज मागविणेत येत आहेत.

<table>
<tr><td>मानधन :-</td><td>महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे दि.१० जून, २०२५ चे शासन निर्णयानुसार.</td></tr>
<tr><td>पदांचा तपशिल</td><td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>पदनाम</th><th>विभागाचे नांव</th><th>भरावयाची पद संख्या</th></tr>
<tr><td>१</td><td>उप-शहर रचनाकार</td><td>नगररचना</td><td>३</td></tr>
<tr><td>२</td><td>उप अभियंता (यांत्रिकी)</td><td>पाणी पुरवठा</td><td>२</td></tr>
<tr><td>३</td><td>सहायक नगररचनाकार</td><td>नगररचना</td><td>४</td></tr>
<tr><td>४</td><td>सहायक अभियंता (यांत्रिकी)</td><td>पाणी पुरवठा</td><td>१</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>पात्रता व अनुभव (सेवा निवृत्त)</td><td>शासकीय / निमशासकीय सेवा वर्ग-१ व वर्ग-२ सवंर्गातील उप अभियंता, सहायक अभियंता (यांत्रिकी) या पदाचा किमान ३ वर्षे अनुभव</td></tr>
<tr><td>वयोमर्यादा</td><td>सेवानिवृत्तीनंतर वयाच्या ६५ वर्षे पर्यंत.</td></tr>
</table>

**सर्वसाधारण सूचना :**

१. वरील कामासाठी नमूद अनुभव धारण करीत असलेस दिनांक१८/०६/२०२६ ते दि०२/०७/२०२६ अखेर पर्यंत कोल्हापूर महानगरपालिका, मुख्य इमारत ब्युरो व नोंदणी विभाग, कोल्हापूर येथे सकाळी ०९.४५ ते सायंकाळी ६.१५ या कार्यालयीन वेळेत सर्व मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकीत प्रतिसह अर्ज सादर करणेचा आहे. अथवा labourofficerkmc@gmail.com या ई मेल वर मूळ कागदपत्रे ॲटॅचमेंट स्वरुपात अपलोड करावयाची आहेत. मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज ग्राहय समजले जाणार नाहीत.

२. अर्जदारांची पात्र / अपात्र यादी को.म.न.पाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

३. अर्ज सादर करणा-या सेवानिवृत्त अधिकारी यांनी आपला भ्रमणध्वनी क्रमांक व ई मेल आय.डी. न चुकता अर्जावर नमुद करण्याचा आहे.

४. नियुक्ती करण्यात आलेल्या अधिका-यांस अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा रु.१००/- चे स्टॅंप पेपर वर प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे लागेल.

५. हि नियुक्ती सेवा करार पध्दतीने असलेने को.म.न.पा कायम सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही.

६. मुलाखतीसाठी अधिका-यांनी स्वःखर्चाने निर्धारीत वेळेत उपस्थित राहणेचे आहे. मुलाखतीची तारीख व वेळ अलाहिदा स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. अ

७. सदरची नियुक्ती कोणत्याही कारणास्तव रदद करणे बाबतचे अधिकार मा.प्रशासक यांना राहतील.

याबाबत सविस्तर अटी / शर्ती Web.kolhapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत आल्या आहेत.

(शिल्पा दरेकर)
**अतिरिक्त आयुक्त**
कोल्हापूर महानगरपालिका

मा.आयुक्त यांचे मान्यतेने }

## को.म.न.पा च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेच्या सर्व साधारण अटी व शर्ती

| अ.क्र. | पदनाम | विभागाचे नांव | विवक्षित कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | उप-शहर रचनाकार | नगररचना | नगररचना विभागाचे कामकाज |
| २ | उप अभियंता (यांत्रिकी) | पाणी पुरवठा | अमृत १.० आणि अमृत २.० प्रकल्प |
| ३ | सहायक नगररचनाकार | नगररचना | नगररचना विभागाचे कामकाज |
| ४ | सहायक अभियंता (यांत्रिकी) | पाणी पुरवठा | अमृत १.० आणि अमृत २.० प्रकल्प |

**१) अर्हता व अनुभव**

१. विविक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.

२. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**२) मासिक व पारिश्रमिक व भत्ते –**

१. मासिक पारिश्रमिक

**(क) शासकीय/निमशासकीय सेवा** - सेवानिवृत्त अधिका-यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मुळ निवृत्तीवेन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणा-या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे. आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.

२. उक्त तरतुदीनुसार निश्चित होणा-या (मासिक पारिश्रमिकाच्या 'जास्तीत जास्त २५ टक्के) इतक्या मर्यादेपर्यंत एकत्रित रक्कम 'निवास भत्ता,प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता' या सर्व भत्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ.बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात येईल.

**३) इतर अटी व शर्ती**

१. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

२. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतवलेले हितसंबंध (Conflict of Interest) व जाहिर करणे आवश्यक राहील.

५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार असणार नाहीत.